
वयोवृद्धः मनोयुवा

## महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ (फेस्कॉम), मुंबई

संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणी क्रमांक : बी.ओ.एम./८४३/८/जीबीबीएसडी दि. २६/११/१९८१

मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नियम १९५० अन्वये नोंदणी क्रमांक : एफ-७५२८ (मुंबई) दि. २५/४/१९८२

कार्यालय पत्ता : ज्येष्ठ नागरिक भवन, सेक्टर १२, प्लॉट नं. ७ सी, गावदेवी मंदिरामागे, नेरूळ (प.), नवी मुंबई - ४०० ७०६.



# फेस्कॉमचे मुखपत्र : मनोहारी मनोयुवा

कार्यालय : अ/७, मिरज-मालगांव रस्ता, सुभाषनगर, ता. मिरज, जि. सांगली - ४१६ ४३७.

वर्ष-३१ अंक-१२ डिसेंबर २०२३



# आधारस्तंभ

चिपळूण तालुक्यातील पिंपली खुर्द येथील **उषातारा कानडे वाचनालय** मासिकाचे आधारस्तंभ वर्गणीदार झालेबद्दल व फेस्कॉमचे मुखपत्र वाचकासमोर उपलब्ध करून देत असलेबद्दल वाचनालयाचे अध्यक्ष, पदाधिकारी यांचे हार्दिक आभार व भावी प्रकल्पाबाबत हार्दिक शुभेच्छा..!



कोल्हापूर प्रादेशिक विभागाचे सदस्य श्री. बाबासाहेब तातोबा व्हनाळे यांच्या वाढदिवसानिमित्त नात/नातू कु. दर्शन, कु. पारस, कु. पर्व, कु. नक्षत्रा यांनी मनोहारी मनोयुवा मासिकास रक्कम रू. २,५०१/- ची देणगी दिली. सोबत आण्णासाहेब दानोळे, संपादिका चेलनादेवी खुरपे, बाबासाहेब व्हनाळे, मुबारक खान व इतर.



खानापूर तालुक्यातील पळशी येथील ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष अशोक नामदेव पाटील, सुलतानगादे येथील (पुरुष) संघाचे अध्यक्ष काका नाथा ठोंबरे व महिला संघाच्या अध्यक्षा शालन तानाजी जाधव यांना मंजूर ओळखपत्रे देताना खानापूर (विटा) चे तहसीलदार मा.उदय गायकवाड आणि निवासी नायब तहसीलदार श्रीमती प्रगती कट्टे. तहसीलदार मा.उदय गायकवाड यांचे महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ (फेस्कॉम) चे वतीने अभिनंदन.

# आरोग्य विभाग शासन निर्णय

## सार्वजनिक आरोग्य विभागाच्या नियंत्रणाखाली शासकिय रुग्णालयांमधील तपासणी व उपचार निःशुल्क करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सावृजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांक : रुशुफी-२०२३/प्र.क्र.१६७/आरोग्य-३,
१० वा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल इमारत,
लोकामन्य टिळक मार्ग, मंत्रालय, मुंबई- ४०० ००१.
दिनांक : २३ ऑगस्ट, २०२३

वाचा :- १) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक : संकिर्ण-२०१३/प्र.क्र.४६२/ भाग-२/आरोग्य-३, दिनांक २८/१२/२०१५

२) आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक- आसेआ/कक्ष-३/टे-२/न.क्र.२३२१/रु.शुल्क मोफत/६५६६५/२३, दि.१२/०६/२०२३.

३) मा. मंत्रीमंडळ निर्णय दि. ०३ ऑगस्ट, २०२३ व इतिवृत्त दिनांक १८ ऑगस्ट, २०२३

**प्रस्तावना :-**

आपल्या देशात कोणतीही व्यक्ती जन्माला आली की, त्या व्यक्तीला भारताच्या राज्यघटनेमध्ये देण्यात आलेले हक्क व अधिकार आपोआपच लागू होतात. आपल्या राज्यघटनेच्या मूलभूत अधिकारांमधील कलम २१ मध्ये जगण्याचा हक्क हा भारतीय नागरिकांचा मूलभूत अधिकार आहे. त्या अधिकारानुसार दर्जेदार, चांगले, निरोगी जीवन जगण्यासाठी अन्न, पाणी, निवारा यांबरोबरच आरोग्यदायी वातावरण, पुरेशा व नियमित आरोग्येवा यांची आवश्यकता असते.

२) भारतामध्ये प्रातिनिधिक लोकशाही असल्यामुळे, भारतातल्या प्रत्येक नागरिकाला सन्मानाने जगण्यासाठी लागणाऱ्या मूलभूत गरजा पुरवण्याची जबाबदारी पूर्णपणे लोकांनी निवडून दिलेल्या लोकप्रितिनिधींची आणि शासनाची आहे. त्याप्रमाणे आरोग्याच्या हक्कात निरोगी जीवन जगता येण्यासाठी आरोग्यकारक परिस्थिती उपलब्ध करणे; व आरोग्याची चांगली पातळी गाठता येण्यासाठी अनेक पातळीवर शासनाने आरोग्यसेवा व सोयी उपलब्ध करणे महत्त्वाचे आहे.

३) प्रत्येक भारतीय नागरिकाला सन्मानाने जगण्यासाठी आवश्यक अशा किमान आरोग्यसेवांची पूर्तता शासनाने करावी अशी माफक अपेक्षा नागरीकांची असते, राज्यातील नागरिकांना उत्तमरित्या आरोग्य सेवा देण्याकरीता आरोग्य विभागाच्या अधिपत्याखालील आरोग्य संस्थांमध्ये संसाधने- साधनसामुग्रीची उपलब्धता, प्रशिक्षित मनुष्यबळ, औषधांची उपलब्धता, आरोग्य विषयक जनजागृती, लसीकरण, औषधोपचार असे अनेक घटक असून त्याप्रमाणे रुग्णशुल्काचा यामध्ये समावेश होत आहे. सद्यःस्थितीत आरोग्य संस्थामधील औषधे व उपचारावरील रुग्ण शुल्क निःशुल्क केल्यास सर्व वंचित, दुर्बल घटकांना याचा मोठ्या प्रमाणात फायदा होणार

आहे.

४) सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक १०/०७/२००१ च्या शासन निर्णयान्वये विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व शासकीय रुग्णालयांमध्ये रुग्णांना पुरविण्यात येत असलेल्या वैद्यकीय सेवा, तपासणी व त्याबाबतचे शुल्काचे दर निश्चित करण्यात आले होते. सदर दरामध्ये त्यावेळी अंमलबजावणी करण्यात आलेली राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना, सार्वजनिक व खाजगी भागीदारी तत्त्वावर Radiology Imaging Diagnostics Services यासारख्या योजनांचा समावेश करण्यात आलेला नाही. तसेच मोजक्याच तपासणी व शुल्क नमूद करण्यात आले होते. त्यामुळे वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या दिनांक ३१/१२/२०१० च्या शासन निर्णयाप्रमाणे असलेल्या उपचार व शुल्कांच्या दराप्रमाणे आरोग्य विभागाच्या अधिपत्याखालील आरोग्य संस्थामध्ये वैद्यकीय सेवा, तपासणी व त्याबाबत शुल्क शासन निर्णय, सार्वजनिक विभाग, दि.२८/१२/२०१५ नुसार निश्चत करण्यात आले.

५) राष्ट्रीय आरोग्य धोरण- २०१७ मध्ये, समाजातील सर्व घटकांसाठी उत्तरोडर युनिव्हर्सल हेल्थ कव्हरेज प्राप्त करणे यामध्ये मोफत व सर्वसमावेशक प्राथमिक आरोग्य सेवांची उपलब्धता सुनिश्चित करणे तसेच आरोग्य सेवा खर्चामुळे नागरिकांच्या खर्चात लक्षणीय घट साध्य करुन परिणामी गरीबीचे निर्मूलन करणे हे उद्दिष्ट्य साध्य होईल. त्यामुळे समाजातील अशा तळागाळातील गरजू रुग्णांच्या दृष्टीकोनातून निःशुल्क वैद्यकीय सेवा देणे हे शासनाचे कर्तव्य असल्याने त्याअनुषंगाने सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत संस्थांमध्ये तपासणी शुल्क व उपचार निःशुल्क करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

(०१) सार्वजनिक आरोग्य विभागाच्या नियंत्रणाखाली शासकीय रुग्णालयामधून करणाऱ्या येणाऱ्या तपासण्या, सेवा व उपचार तसेच सार्वजनिक खाजगी भागीदारी तत्त्वावरील वैद्यकिय सेवा (राष्ट्रीय रक्त धोरणानुसार रक्त व रक्त घटक पुरवठा यासाठी आकारण्यात येणाऱ्या सेवा शुल्क वगळून) निःशुल्क करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

(०२) विभागाच्या अधिपत्याखाली शासकीय रुग्णांलयामध्ये तपासणी व रुग्णशुल्क, सेवा या निःशुल्क करण्यात आल्यामुळे संदर्भ क्र.०१ अन्वये दि.२८/१२/२०१५ रोजीचा शासन निर्णय अधिक्रमित करण्यात येत आहे.

(०३) राष्ट्रीय रक्त धोरणानुसार रक्त व रक्त घटक पुरवठा यासाठी आकारण्यात येणाऱ्या सेवा शुल्कांबाबत स्वतंत्रपणे कार्यवाही करण्यात येईल.

(०४) या शासन निर्णयाच्या अनुषंगाने उपचार व सेवा रुग्ण शुल्क निःशुल्क करण्यात आल्यामुळे रुग्णालयाच्या दर्शनी भागावर/ फलकावर याबाबत सूचना प्रदर्शित करण्यात यावे. तसेच सदर निर्णय व्यापक प्रसिध्दी देण्याबाबत आयुक्त, आरोग्य सेवा यांनी कार्यवाही करावी.

(०५) तपासणी व उपचार सेवा निःशुल्क केल्यानंतर रुग्णांची/ जनतेची दिशाभूल/ फसवणूक करुन रुग्ण शुलक घेताना आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात यावी. याबाबत आयुक्त, आरोग्य सेवा यांनी कार्यपध्दती निश्चित करावी.

(०६) सदर शासन निर्णय दिनांक १५ ऑगस्ट, २०२३ पासून अंमलात येत आहे. सदर शासन निर्णय मा.राज्य मंत्रिमंडळाची दि.०३ ऑगस्ट, २०२३ रोजी झालेल्या बैठकीतील विषय क्र.९ अन्वये दिलेल्या मान्यतेस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

(०७) सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थहावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२३०८२३१३२४१९१७ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(अशोक आत्राम)**
सह सचिव, महाराष्ट्र शासन

***

(श्री. शाहीन शेख संपादित
'स्वतंत्र माहिती अधिकार
या पुस्तिकेतून साभार...'

# महिलांच्या सुरक्षिततेसाठी महाराष्ट्र शासनाने केलेल्या उपाययोजना

*** महिला अत्याचार प्रतिबंधक विभाग (PAW):** महाराष्ट्र (गृहविभाग) शासन निर्णय क्र.पी.पी.ए.१३९४/५/पोल-८ दिनांक २९/०९/१९९५ अन्वये महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय याठिकाणी महिला अत्याचार प्रतिबंधक विभागाची प्रथमतः स्थापना करण्यात आली. सध्या हा विभाग राज्य गुन्हे अन्वेषण विभाग संगम ब्रिज पुणे याठिकाणी कार्यरत आहे. विशेष पोलीस महानिरीक्षक दर्जाचे अधिकारी या विभागाचे प्रमुख आहेत.

*** महिला पोलीस कक्ष (महिला सहायता कक्ष) :** महाराष्ट्र राज्यामध्ये महिला विरूध्द गुन्हयास प्रतिबंध करणे, गुन्हे उघडकीस आणणे व गुन्हयांचा तपास करणे इ.कामे संबंधीत पोलीस ठाण्याकडून केले जातात. महिला विरूध्द प्रकरणे हाताळण्यासाठी सर्व पोलीस ठाण्यांमध्ये महिला पोलीस कक्षाची निर्मिती करण्याबाबत पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य, यांनी परिपत्रक पारीत केले आहे. महिला पोलीस अधिकारी आणि महिला पोलीस कर्मचारी यांची उपलब्धतेनुसार या कक्षामध्ये नेमणूक करण्यात आली आहे. आज पावेतो एकूण ९७५ महिला पोलीस कक्ष स्थापन करण्यात आले आहेत.

*** महिला सुरक्षा समिती :** राज्यातील सर्व पोलीस ठाण्यात व ४५ पोलीस घटकांच्या मुख्यालयात महिला सुरक्षा समिती स्थापन करण्यात आल्या आहेत. या समितीव्दारे संघर्षग्रस्त महिलांना कायदेविषयक सहाय्यता मिळवून देण्याकरिता पोलीसांच्या मध्यस्थिने पुर्ण सहकार्य करण्यात येते. या समितीमध्ये महिला डॉक्टर, महिला वकील, महिला प्राध्यापक, सामाजिक कार्यकर्त्या इत्यांदीचा समावेश करण्यात येतो.

*** सामाजीक सुरक्षा विभाग :** पोलीस मुख्यालयामध्ये सामाजीक सुरक्षा विभाग कार्यरत असून या विभागाकडून अत्याचारासंबंधी गुन्हयांचा तपास करण्यात येतो. सध्या अशा प्रकारचे ३३ विभाग कार्यरत आहेत.

*** विशेष समुपदेशन केंद्र (स्पेशल कौन्सेलींग सेंटर) :** महाराष्ट्र राज्यात आज पावेतो एकूण ९० विशेष समुपदेशन केंद्र पोलीस ठाण्याच्या आवारात कार्यरत आहेत. अशा केंद्रांना स्वतंत्र्य कार्यालय, प्रसाधनगृह, फर्निचर, दुरध्वनी इत्यादी सर्व सुविधा पोलीस खात्याकडून पुरवण्यात आल्या आहेत. उच्च न्यायालयाच्या निर्देशानूसार हे केंद्र महिला व बाल कल्याण विभागाशी समन्वय साधून काम करते. हे केंद्र विशेष कौटुंबिक वादासंबंधी संघर्षग्रस्त महिलांना सहकार्य करते. शासनाने ५४ नवीन केंद्रास मान्यता दिली आहे.

*** बसस्थानकातील मदत केंद्र :** न्यायाधीश धर्माधिकारी समितीच्या शिफारसीनुसार महिला व बालकांच्या अनैतिक व्यापारास आळा घालण्यासाठी बसस्थानकामध्ये मदत केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत.

*** स्त्री भृणहत्या प्रतिबंधक उपाययोजना :** गर्भधारणापूर्व व प्रसुतीपूर्व लिंग निदान तंत्र प्रतिबंधक अधिनियम १९९४ व वैद्यकीय गर्भपात अधिनियम १९७१ या कायद्यांची परिणामकारक अंमलबजावणी करण्याकरिता पोलीस उपअधीक्षक/उपविभागीय पोलीस अधिकारी या दर्जाच्या अधिकाऱ्यांची समन्वय अधिकारी (नोडल ऑफिसर) म्हणून नियुक्ती करण्यात आली.

*** हेल्पलाईन :** संकटात असणाऱ्या महिलांना मदत करण्यासाठी मुंबई ठाणे आणि नवी मुंबई या पोलीस घटकांमध्ये टोल फ्रि हेल्पलाईन क्र.१०३ व उर्वरीत महाराष्ट्रासाठी टोल-फ्री हेल्पलाईन क्र.१०९१ सुरू करण्यात आली.

*** विशेष बाल सहायक पोलीस पथक आणि बाल कल्याण अधिकारी (स्पेशल ज्युवेनाईल युनिट अँड चाईल्ड वेल्फेअर ऑफिसर) :**

संघर्षग्रस्त मुलांची काळजी घेण्यासाठी व त्यांचे संरक्षण करण्यासाठी महाराष्ट्रातील सर्व जिल्हयांमध्ये बाल कल्याण समिती (चाईल्ड वेल्फेअर कमिटी) आणि बाल न्यायमंडळ (ज्युवेनाईल जस्टीस बोर्ड) स्थापन करण्यात आले आहेत. राज्यातील सर्व ४५ पोलीस घटकामध्ये विशेष बाल सहाय्यक पोलीस पथक स्थापन करण्यात आले असून १०२८ पोलीस ठाण्यामध्ये बाल कल्याण अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आली आहे.

* **लैंगिक अपराधापासून मुलांचे संरक्षण अधिनियम २०१२ :** या कायद्यान्वये गुन्हे दाखल करण्याचे प्रशिक्षण पोलीस अधिकाऱ्यांना देण्यात आले असून १५२ कार्यशाळा आयोजीत करून १७०५ पोलीस अधिकारी व ४५४८ पोलीस कर्मचाऱ्यांना या कायद्याची परिणामकारक अंमलबजावणी करण्याबाबत प्रशिक्षण देण्यात आले आहे.

* **कौटुंबिक हिंसाचार अधिनियम २००५ :** महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण करण्यासाठी हा कायदा अंमलात आणण्यात आला आहे. महिला व बाल कल्याण विभागाने नियुक्त केलेले संरक्षण अधिकारी (प्रोटेक्शन ऑफिसर) या कायद्याची अंमलबजावणी करतात.

* **विशेष आणि जलदगती न्यायालय :** महिला अत्याचारासंबंधी गुन्हे यांचा जलद गतीने निपटारा करण्यासाठी अहमदनगर, अकोला, अमरावती, औरंगाबाद, बुलढाणा, बीड, जळगाव, नागपूर, यवतमाळ, ठाणे, पुणे आणि कोल्हापूर या ठिकाणी विशेष न्यायालये कार्यरत आहेत. महिला आणि मानसिक विकलांग मुलीवरील अत्याचारासंबंधी गुन्हयांचा निपटारा करण्यासाठी २५ जलदगती न्यायालये प्रस्तावित आहेत.

* **हुंडाबळी प्रतिबंधक कारवाई :** महाराष्ट्र शासन निर्णय क्र.डी. पी.ए.१०८३/८०५१९/सी.ए.-३ दिनांक २९/०१/१९८५ अन्वये महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हयामध्ये जिल्हा दक्षता कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. जिल्हा अधिकारी या कक्षाचे अध्यक्ष असून पोलीस अधीक्षक, समाज कल्याण अधिकारी, वकील, महिला वैद्यकीय अधिकारी, स्थानिक महाविद्यालयाचे प्राचार्य, सामाजीक कार्यकर्ते आणि महिला संघटनांचे सभासद या कक्षामध्ये काम करतात. या कक्षाची मिटींग दर तीन महिन्यांनी जिल्हाधिकारी आयोजीत करतात.

* **कामाच्या ठिकाणी तक्रार कमिटी (तक्रार निवारण समिती) :** सर्वोच्च न्यायालय नवी दिल्ली यांच्या न्यायनिर्णयातील मार्गदर्शक तत्वे (विशाखा जजमेंट) विचारात घेऊन ४५ पोलीस घटकांच्या मुख्यालयात व राज्य गुन्हे अन्वेषण विभाग पुणे येथे या समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. महिला पोलीस अधिकारी/कर्मचारी व पोलीस कार्यालयात कार्यरत असणाऱ्या मंत्रालयीन महिला कर्मचारी यांच्या कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळाची प्रकरणे या समितीकडून हाताळण्यात येतात.

* **महिलांच्या तक्रारीबाबत पोलीसांची संवेदनशीलता :** महाराष्ट्र पोलीस अकादमी नासिक याठिकाणी पोलीसांच्या पायाभूत अभ्यासक्रमामध्ये महिला - मुलांवरील अत्याचार व लैंगिक गुन्हे याबाबतच्या कायद्यांचा समावेश करण्यात आला आहे.

* **न्यायाधीश धर्माधिकारी समिती :** महिलांवरील अत्याचाराच्या गुन्ह्यास आळा घालण्यासाठी शासनाने निवृत्त न्यायाधीश श्री. चंद्रशेखर धर्माधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली आहे. या समितीने तीन अंतरीम अहवाल सादर केले असून पहिल्या दोन अहवालातील सूचनांची अंमलबजावणी पोलीस खात्याकडून करण्यात येते आणि तिसऱ्या अहवालातील सूचनांची अंमलबजावणी विचाराधीन आहे.

* **अनैतिक व्यापार विरोधी कक्ष (अँन्टी ह्यूमन ट्राफिकींग सेल) :** अनैतिक व्यापाराच्या विविध समस्या तत्परतेने, परिणामकारक व जलदगतीने सोडवण्यासाठी महाराष्ट्र शासनाने राज्य गुन्हे अन्वेषण विभागाच्या अधिपत्याखाली अनैतिक व्यापार विरोधी कक्ष दिनांक ३१/०३/२००८ रोजी स्थापन केला

आहे. तसेच विशेष पोलीस महानिरीक्षक (म.अ.प्र.वि.) गुन्हे अन्वेषण विभाग म.रा.पुणे यांची महाराष्ट्र राज्याचे समन्वय अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे.

महाराष्ट्र राज्यामध्ये १२ अनैतिक व्यापार विरोधी पथके स्थापन करण्यात आली असून मुंबई, ठाणे शहर, ठाणे ग्रामिण, पुणे, सांगली, नागपूर, अहमदनगर, नवी मुंबई, सोलापूर शहर, बीड, कोल्हापूर आणि यवतमाळ या जिल्हयांमध्ये ही पथके पुर्णत: कार्यरत आहेत. प्रत्येक पथक २ अशासकीय संघटना (एन.जी.ओ.) आणि महिला व बाल कल्याण अधिकारी यांचेशी निगडीत ठेवण्यात आले असल्याने ते अनैतिक व्यापाराचा बिमोड करण्यास कटीबध्द आहेत. त्यांना पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या असून ते सुटकेची कारवाई (रेस्क्यू ऑपरेशन्स) करण्यात अग्रस्थानी आहेत. ही पथके स्थापन झाल्यापासून वेगवेगळी रेस्क्यू ऑपरेशन्स घडवून आणली आहेत व पीडितांची सुटका करून तस्करांना अटक करण्यात आली आहे. महाराष्ट्रात पोलीस आयुक्तालयातील समाजसेवा शाखेमध्ये व जिल्हयातील गुन्हे शाखेमध्ये कार्यरत असणारे पोलीस निरीक्षक अनैतिक व्यापार विरोधी 'विशेष पोलीस ऑफिसर' म्हणून जाहीर करण्यात आले आहेत.

## छेडछाड विरोधी कायदा

राज्य सरकार आणि केंद्रशासित प्रदेशात सूचना देण्यात येते की, सिव्हिल ड्रेसमधील महिला पोलीस बसस्टेशन, मेट्रो स्टेशन्स, सिनेमा थिएटर, बाजार, शॉपिंग मॉल, बगीचे, समुद्र किनारे, मंदिर परिसर याठिकाणी नेमण्यात यावेत.

वरील सर्व ठिकाणी सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविण्यात यावेत. शैक्षणिक संस्था, मंदिराचे ट्रस्टी, सिनेमा थिएटरचा मालक, रेल्वे स्टेशन, बसस्टेशनचे इनचार्ज यांनी छेडछाड रोखण्यासाठी त्यांच्याकडे तक्रार आल्यावर त्वरित जवळच्या पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल करावी आणि त्यांच्या परिसरातील छेडछाडीस आळा बसविण्यासाठी पुढाकार घेऊन भूमिका घ्यावी.

बसमध्ये अगर रेल्वेत एखाद्या महिला प्रवाशाबाबत अशी घटना घडल्यास चालक, वाहक यांच्याकडे अशी तक्रार केली असता सदर वाहन हे पोलीस स्टेशनला घेण्यात यावे आणि सदर चालक-वाहकाने गुन्हा दाखल करावा, तसे न केल्यास सदर वाहनाचा परवाना रद्द करावा.

* * *

**मेडिकल स्टोअरमध्ये उपलब्ध नसलेल्या औषधांचे प्रकार तुम्हाला माहीत आहेत का ?**

व्यायाम हे औषध आहे.
सकाळ/संध्याकाळ चालणे हे औषध आहे.
उपवास हे औषध आहे.
कुटुंबासोबत जेवण हे औषध आहे.
हसणे आणि विनोद हे देखील औषध आहे.
गाढ झोप हे औषध आहे.
सर्वांशी मिळून वागणे हे औषध आहे.
आनंदी राहण्याचा निर्णय हे औषध आहे.
मनातील सकारात्मकता हे औषध आहे.
प्रार्थना हा एक चांगला आध्यात्मिक व्यायाम आणि औषध आहे.
सर्वांचे भले हे औषध आहे.
इतरांसाठी प्रार्थना हे औषध आहे.
कधी कधी मौन हे औषध असते.
प्रेम हे औषध आहे.
मन:शांती हे औषध आहे.

आश्चर्याची गोष्ट म्हणजे ही सर्व औषधे पूर्णपणे मोफत आहेत आणि सर्व एकाच ठिकाणी कुठे मिळवायचे? प्रत्येक चांगला मित्र हे एक परिपूर्ण मेडिकल स्टोअर आहे.

**– मिलिंद सरदार**

# सर्वथैव सक्षमता (आर्थिक/शारीरिक/मानसिक)
# बृहन्मुंबई महानगरपालिका पेन्शनर्स असोसिएशन

रजि.क्र.१) २९०/४ - जी बी एस डी    रजि.क्र.२) एफ/३५१० मुंबई दि. ३१.१२.१९७४

कार्यालय : बृहन्मुंबई महानगरपालिका जी/उत्तर विभाग कार्यालय इमारत, खोली क्र. ९, तळमजला, हरिश्चंद्र येलवे मार्ग, दादर (पश्चिम), मुंबई ४०० ०२८.

दूरध्वनी क्र. २४३९ ७९३३, २४३९ ७८००, २४३६ ७९७०

E-mail : mmpasso739@gmail.com    **Website :** www.bmpa.co.in

(नमुना अर्ज, फॉर्म्स, परिपत्रके व आवश्यक माहितीसाठी)

आशिया खंडातील, सर्वार्थाने, सर्वात मोठ्या महानगरपालिकेच्या १,१०,००० निवृत्ती वेतन धारक / कुटुंब निवृत्ती वेतन धारकांचे प्रतिनिधित्व करणारी एकमेव नोंदणीकृत संस्था

## सुवर्ण महोत्सव (१९७४ - २०२४)

## सुवर्ण महोत्सव शुभारंभ कार्यक्रम

**शनिवार, दि. १३ जानेवारी २०२४**    **स्थळ : यशवंत नाट्य मंदिर**

**वेळ : सकाळी ९.४५ ते सायं. ४.३०**    **दादर (पश्चिम), मुंबई.**

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या निवृत्तीवेतन धारक / कुटुंब निवृत्ती वेतन धारकांना आवाहन :

- शिक्षण, कला, क्रीडा, संगीत, लेखन, काव्य इ. क्षेत्रात उत्तुंग कार्य केलेल्या सेवा निवृत्त मंडळींनी आपल्या योगदानाबाबत, संस्थेस त्वरीत माहिती सादर करावी.
- सामाजिक क्षेत्रात कार्य उभारणाऱ्या सेवानिवृत्त मंडळींनी त्यांचे योगदानाबाबतची माहिती संस्थेस उपलब्ध करून द्यावी.
- बु.मुं.मनपा पेन्शनर्स असोसिएशनचे सभासद व्हा...संपर्कात रहा...असोसिएशन सदैव आपल्या सोबत आहे.

## संपर्क

श्री. कमलाकर व्यं. क्षीरसागर
अध्यक्ष, ९८१९१३८२५४
श्री. वामन कुटुंबे
(वाशी) ९८१९०३२७७३
श्री. शिवराम अतकरी
(मुलुंड) ९८९२९१६३२४
श्री. सुरेश सावंत
(बोरीवली) ९८६९१८६८१२

डॉ. श्री. मारुती नलावडे
कार्यवाह, ९८६९७२२२३८
श्रीमती हेमलता हटकर
(वसई) ९१३७०६१८०३
श्री. काशीनाथ पाटील
(वसई) ९८२३४२४९६९
श्री. दिलीप करंदीकर
(डोंबिवली) ९८३३८५६८५२
श्रीमती शिल्पा पटवर्धन
(कल्याण) ९८२०३३६५७६

श्री. विजयकुमार पोतदार
(बदलापूर) ९७६६५२५२६
श्री. सुहास खामकर
(ठाणे) ९८२०८४०२५३
श्रीमती नीता मांजरेकर
(गोरेगांव) ९६५३३२८७५६
श्री. सुधीर सावदेकर
(पुणे) ९८१९७५४४६६

मनोयुवाच्या वाचकांना आवाहन - आपल्या परिचयातील मुंबई महानगरपालिकेच्या निवृत्तीवेतन धारकांना माहिती द्या.

Periodical Registered with Registrar of Newspaper for India (RNI) No. MAHMAR/2003/10732
Postal Licence Reg. No. : SGL/133/2021-2023

# श्रीगोंदा तालुका समन्वय समिती, श्रीगोंदा. जि. अहमदनगर.

महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ (फेस्कॉम) शी संलग्न


## नगर-नाशिक प्रादेशिक विभागाच्या अधिवेशनास हार्दिक शुभेच्छा



बशीर अमीनोद्दीन काझी
अध्यक्ष



बाबासाहेब गंगाराम ओहोळ
उपाध्यक्ष



पोपट भिवाजी छत्तीसे
सचिव



किसनराव हरीभाऊ कळगुंडे
कोषाध्यक्ष



सौ. हिराबाई दत्तू गोरखे
महिला उपाध्यक्षा



श्रीमती सुषमा घोडके
महिला कोषाध्यक्षा

झुंबर सदाशिव राऊत
सदस्य

बापूराव पोपट पवार
सदस्य

राजेंद्र शांतीलाल कोठारी
सदस्य

भंडाबाई सूर्यभान तरटे
सदस्य

रमेश बबन काटे
सदस्य

अशोक तुकाराम शिंदे
सदस्य

मैना मोहन जामदार
सदस्य

रावसाहेब महाडीक
सदस्य

ॲड. रंगनाथ बीबे
मोफत कायदेशीर सल्लागार

यांची निवड झाल्याबद्दल **हार्दिक अभिनंदन** व भावी वाटचालीस **शुभेच्छा**

-: शुभेच्छुक :-
**सर्व ज्येष्ठ नागरीक संघ, श्रीगोंदा तालुका**

कृपया अंक पत्त्यावर द्यावा. वितरीत न झालेस सकारण परत करावा.
अपूर्ण पत्ता ☐ /मयत ☐ /पत्ता सोडून गेले ☐ /पोस्टमन बीट क्र. ☐

प्रेषक :
श्री. अंजुमन खान
फेस्कॉम उपाध्यक्ष व प्रमुख, फेस्कॉम मनोयुवा कौन्सिल
अ/७, सुभाषनगर, ता. मिरज, जि. सांगली - ४१६ ४३७.
मोबा. ९४२२५८३००४

PRINTED MATTER

प्रति,